केसरी
: www.dailykesari.com
पुणे, ४ फेब्रुवारी २०२४
: @kesarinewspaper


# हुतात्मा राजगुरूंच्या कर्तृत्वाचा वारसा पुढे चालवावा : देवेंद्र बुट्टेपाटील

## वार्षिक पारितोषिक, गुणगौरव समारंभ



**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान देणाऱ्या हुतात्मा राजगुरूंच्या विचारांचा, कर्तृत्वाचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढे चालवावा, प्रामाणिकपणे अभ्यास करावा आणि स्वतःला करिअररूपाने सिद्ध करावे. असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शांताराम घुमटकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी.दौंडकर उपस्थित होते. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दोन्ही महाविद्यालयातील विविध उपक्रमांचे व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. महाविद्यालयातील क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभाग तसेच विविध शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

यावेळी क्रिडा विभागातील मीनाक्षी साळुंखे, सृष्टी बोऱ्हाडे, आदिल सिकीलगार, तनिष्का काळे, आविष्कार स्पर्धेतील सुमित इंगोले, एन.सी.सीतील निरंजन कोरडे, तेजस देसले, वक्तृत्व स्पर्धेतील तेजस्विनी गौड, अक्षदा कोळेकर यांच्यासह पीएच.डी. प्राप्त प्राध्यापकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

Scanned with OKEN Scanner